# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक


सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : ५०१/२०२४/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.निलेश भास्करराव भावसार,<br>रा. फ्लॅट नं. १३ पृथ्वीलोक अपार्टमेंट,<br>अभियंता नगर, कामटवाडे, नाशिक, ता.जि. नाशिक | विस्तार अधिकारी (ग्रा.पं) पंचायत समिती कार्यालय,<br>त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक |

सुनावणी दिनांक १४/१०/२०२५

तक्रारदार यांनी दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १४/१०/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार उपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दिनांक २७/०६/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती दिली नाही.सबब, त्यांच्यावर कलम २० (१) नुसार प्रत्येक दिवसाला रुपये २५० प्रमाणे जी रक्कम २५००० पेक्षा जास्त नको एवढी शास्ती लावण्यासह कलम २० (२) नुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात यावी.तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) ख नुसार मला झालेल्या शारिरीक, मानसिक त्रासापोटी रुपये ५०,००० (पन्नास हजार ) नुकसान भरपाई मिळावी."

३) तक्रारदार यांनी दिनांक २७/०६/२०२३ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"शासन परिपत्रक क्र: व्हिपीएम-२०१३/प्र.क्र १३७/पंश-३ अनुसार ग्रा.पं. मधील गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या कर्मचारी यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यासाठी स्पष्ट असतांना, पं.स त्र्यंबकेश्वर यांनी दोषींवर फौजदारी कारवाई केलेली नसुन त्याबाबत रितसर माहितीसाठी हा माहिती अधिकार."*

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी दिनांक १३/०१/२०२५ अन्वये आयोगास अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, " श्री. भावसार यांचे कडील माहितीचा अधिकार अर्ज दि.२७/०६/२०२३ रोजीच्या अनुषंगाने शासन परिपत्रक प्र.क.१३७/पंरा.३ अनुसार ग्रा.पं.मधील गैरव्यवहारास नमूद माहितीसाठी मूळ अर्ज तत्का. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाढोली, ता.त्र्यंबकेश्वर यांना दिनांक २०/०७/२०२३ अन्वये हस्तांतरीत करुन अर्जदारास अर्जाच्या अनुषंगाने लेखी माहिती पुरविण्यात बाबत कळविण्यात आलेले आहे.

श्री.बी.एस.पवार तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं) पं.स.त्र्यंबकेश्वर दि. ३०/६/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत."

५) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तत्कालीन जन माहिती अधि कारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं) पंचायत समिती कार्यालय, त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचा दिनांक २७/०६/२०२३ चा माहिती अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,वाढोली,ता.त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक यांचेकडे हस्तांतरीत केल्याचे दिसून येते व याबाबत तक्रारदार यांना देखील अवगत केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करणे अभिप्रेत होते.मात्र तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच तक्रारदार यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रार अर्जात संबंधित प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांना प्रतिवादी देखील केल्याचे दिसून येत नाही.याबाबत सुनावणीवेळी तक्रारदार यांना विचारणा केली असता,त्यांना काहीही संगता आले नाही. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब,प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तूत तक्रार क्र. **५०१/२०२४/नाशिक** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र.१८४८

12 MAR 2026